॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ८ ऑक्टोबर : राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी राज्याच्या शिक्षण संचालनालयाच्या निर्देशानुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी कृती समिती गठित केली असून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे हे अध्यक्ष तर कुलसचिव डॉ. विनोद पाटील हे समितीचे सचिव आहेत.

या समितीमध्ये ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील आणि विद्यार्थी विकास संचालक डॉ. प्रवीण महाले यांचा देखील समावेश आहे.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील जळगाव, धुळे आणि नंदुरबार या जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त भागात वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी समितीने तातडीने विद्यापीठात बैठक घेतली. महाराष्ट्र शासनाने जाहीर केल्यानुसार व राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांनी मार्गदर्शन केल्यानुसार दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफ करण्याची घोषणा केली असल्याने या निर्णयाची परीपूर्ण अंमलबजावणी समितीकडून करण्यात येणार आहे.

तसेच विद्यापीठाच्या 'कमवा व शिका' योजनेतील विद्यार्थ्यांच्या मानधनात वाढ करण्यात येवून दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी कमाल संख्येची मर्यादा वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. याकरीता तरतूद वाढविण्यात येणार आहे.

याशिवाय विद्यापीठाच्या आर्थिक दुर्बल घटक योजनेचा लाभ दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांनाही मिळावा, यासाठी तरतूद वाढविण्यात आली आहे. या संबंधित योजनांचा विद्यार्थ्यांना लाभ मिळवून देणे त्याकरीता पाठपुरावा करणे, योजनेची अंमलबजावणी तंतोतंत करणे अशी कामे समितीमार्फत करण्यात येणार आहेत.

तसेच दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या वसतिगृह शुल्कात सवलत देण्यात येणार आहे व वसतिगृहात लॅपटॉप वापराच्या शुल्कातही सवलत देण्यात येणार आहे.

दरम्यान, विद्यापीठात ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस आयोजित करण्यात येणाऱ्या युवारंग युवक महोत्सवातही खर्चात काटकसर करण्याचे निर्देश कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी दिले आहेत. त्यानुसार युवक महोत्सव आयोजन समितीच्या अध्यक्ष व सचिवांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत काटकसरचे धोरण स्वीकारण्यात येवून खर्चात बचत करण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळावी आणि विद्यापीठाच्या खर्चातही काटकसर करून उपलब्ध निधीचा योग्य वापर व्हावा, यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. अशी माहिती कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी दिली.

.......................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ८ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**